01:16:57 PM

नि.दि. दावा क्र.१९३/२०२१

साहेबराव वि. भानुदास

**निशाणी क्र. २९ लगत**

**आदेशः** निशाण ४/१ व २ येथील दाखल कागद सार्वजनिक स्वरुपाचे असल्यामुळे त्याला **निशाण क्र.३२ व ३३** देण्यात येते. निशाण २८ च्या यादी सोबत अनु.क्र.१ येथे दाखल असणारा सातबारा सार्वजनिक स्वरुपाचा असल्यामुळे त्याला **निशाण क्र.३४** देण्यात येते. निशाणी ३६/१ येथील फेरफार सार्वजनिक स्वरुपाचा असल्यामुळे त्याला **निशाण क्र.३७** देण्यात येते.

**उलटतपास प्रतिवादी यांच्यातर्फे विधिज्ञ श्री. व्ही.के.चव्हाण यांच्यामार्फत**

२. हे खरे आहे की, आंबा हे गावात भवर परिवार मोठा आहे. हे खरे आहे की, तिथून १ किमी अंतरावर आंबातांडा ही वस्ती आहे. हे खरे आहे की, बंडू रंगनाथ भवर हे माझे वडील आहे. हे खरे आहे की, माझे वडील १९७२ च्या सुमारास बेपत्ता झाले. हे खरे आहे की, ते मयत झाले की नाही हे मला माहित नाही. हे खरे आहे की, त्यांचा अंतिम संस्कार आम्ही केलेला नाही. हे खरे आहे की, बंडूची सासरवाडी लामनगाव, ता.कन्नड येथे आहे.

३. माझी आई १९६९ साली वारली. हे खरे आहे की, माझ्या आईवडीलांना ३ मुली होत्या. मोठ्या बहिणीचे नाव कडुबाई, दुस–या बहिणीचे नाव केसरबाई आणि तीसरी शोभाबाई आहे. कडूबाई १९७७ साली मयत झालेली आहे. केसरबाई आणि शोभाबाई हयात आहे. हे खरे आहे की, ज्यावेळेस वडील बेपत्ता झाले आणि माझी आई वारली त्यावेळेस मी लहान होतो. हे खरे आहे की, माझा सांभाळ माझ्या मामांनी केला. हे खरे आहे की, बहिणींनी हक्कसोड पत्र करुन दिलेले नाही. हे खरे आहे की, वारस प्रमाणपत्रावर बहिणींचे नाव नाही. माझे बहिणींचे लग्न होवून अंदाजे ४० वर्ष झालेली आहेत. हे खरे नाही की, मामाने मुलगी दिल्यामुळे मी त्यांच्याकडेच राहिलो. हे खरे आहे की, जोपर्यंत मला समजत नव्हते तोपर्यंत मी

मामांकडे राहिलो. मला १९७७ सालापासून समज आली. त्यावेळेस माझे वय १६ ते १७ असेल. हे खरे आहे की, त्यावेळेस माझे लग्न झाले नव्हते. मी १५ वर्ष हॉटेलमध्ये काम केलेले आहे. मी कन्नड येथे हॉटेलमध्ये काम करत होतो व कन्नड येथे राहत होतो.

४. हे खरे नाही की, मला कळायला लागल्यापासून मी केवळ जुनूने शिवारालगतच आंबातांडा येथील जमीन करत होतो. हे खरे नाही की, आंबा गावच्या दक्षिणेला भवर परिवाराच्या वेगवेगळ्या जमीनी असून त्याठिकाणी कमी क्षेत्राचे भाग असल्यामुळे तिथे कोणीही वहिती करत नाही. गट क्र.२५५ च्या पूर्वीचा सर्वे नंबर मला सांगता येणार नाही. सर्वे नंबरचा गट कधी झाला हे मी सांगू शकत नाही. पूर्वीचा सर्वे नंबर माझ्या आजोबांच्या नावे होता. त्याचा उतारा मी या प्रकरणात दाखल केलेला नाही.

५. हे खरे आहे की, गट क्र.२३९ चा मुळ मालक बाळु रायभान आहे. हे खरे आहे की, गट क्र.२३९ चे क्षेत्र १८ आर आहे. हे खरे आहे की, बाळफ रायभान हा दि.२०.०४.१९८३ च्या सुमारास मयत झाला. हे खरे आहे की, तो ज्यावेळेस मयत झाला त्यावेळेस भानुदास आणि काकासाहेब हे दोन मुलं आणि ४ मुली आणि पत्नी सुशीलाबाई होते. हे खरे आहे की, भानुदास आणि काकासाहेब हे लहान असल्यामुळे सुशिलाबाईच्या नावे फेर झाला.

**दुपारची सुटी झाल्यामुळे उलटतपास दुपारच्या सुटीपर्यंत तहकूब.**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2025.11.06 17:48:06 +0530

(वि. द. पाटील)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कन्नड.

कन्नड.
दिनांक : ०६/११/२०२५
01:57:41 PM

## CERTIFICATE

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | |
|---|---|
| Name of Stenographer | V. D. Khambat, (Grade-III) |
| Court | Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Kannad |
| Date | 06.11.2025 |
| Order signed by the Presiding Officer | 06.11.2025 |
| Order uploaded on | 06.11.2025 |